
Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 3 No. : 3 Sep - Dec 2016 ISSN No. 2347-9639

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

## धर्मनिरपेक्षता




महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मुख्य संपादक - प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
संपादक - डॉ. प्रमोद पवार | सहसंपादक - डॉ. मनोहर पाटील

Scanned with CamScanner

33 Year's

Maharashtra Political Science & Public Adminstraction Conference's Research Journal

# VICHAR MANTHAN

## National Research Journal of Political Science and Public Administration

(A Peer Reviewed Journal)

Volume - 3 | Number - III | Sept - Dec. 2016



**♦ Chief Editor / President ♦**

**Prin. Dr. P. D. Deore**

11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc., Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13 Mob : 9423980457

**♦ Editor ♦**

**Prin. Dr. Pramod Pawar**

Dhandai Arts College, **Amalner** Dist. Jalgaon

Email- pramodpawar1761@gmail.com Mob:**9423582073**

**♦ Secretary ♦**

**Prin. Dr. Manohar Patil**

S.S.V.P.S College, **Dhule**

Email-manoharpatil123@gmail.com Mob:9422287053

**♦ Advisory Editors ♦**

**Dr. Vitthal More** (Latur)
**Dr. Vasanti Rasam** (Kohlapur)
**Dr. Alka Deshmukh** (Nagpur)
**Dr. Prakash Pawar** (Kohlapur)
**Dr. Bal Kamble** (Karjat-Pune)
**Dr. Balasaheb Bhosale** (Tasgaon)
**Dr. Jyostna Sonkhaskar** (Tryambkeshwar)
**Dr. Sanjay Gore** (Gadchiroli)
**Dr. Surendra Jondhale** (Mumbai)
**Dr. Bharati Patil** (Kolhapur)
**Dr. Mohan Kashikar** (Nagpur)
**Dr. Rajeshwari Deshpande** (Pune)
**Dr. Ashok Naikwade** (Aurangabad)
**Dr. Pyarelal Suryawanshi** (Amravati)
**Dr. Suresh Bhalerao** (Parbhani)
**Dr. Sanjay Wagh** (Mumbai)

**♦Hon'ble Guest Editiors ♦**

**Dr. Sanjeevkumar Sharma** (Meerut)
**Dr. Shilpi Bose** (Raipur)
**Dr. Ketan Govekar** (Panji, Goa)
**Dr. Garima Jawualkar** (Bhopal)
**Dr.Shaikh Abul Barkat** (Hydrabad)
**Dr. Sushama Yadav** (New Delhi)
**Dr. Subhash Chandrakar** (Raipur)
**Dr. SunilKumar Goyal** (Khandwa)
**Dr. Anita Deshpande** (Bhopal)
**Dr.J.Prabhash** (Kerala)

**♦ Editing Assists ♦**

**Dr. Sambhaji Patil** (Shindkheda)
**Asst. Prof. Viqar Shaikh** (Jalgaon)
**Mrs. Manisha Pawar** (Jalgaon)
**Asst. Prof. Gautam Bhalerao** (Jalgaon)
**Asst. Prof. Sanjay Patil** (Chopada)
**Mr. Javed Tadavi** (Jalgaon)

**♦ Managing Editor ♦**

Mr. Yuvraj Mali



**♦ Publishers ♦**

**Atharva Publications**

Basement, Om Hospital, Near Anglo Urdu Highschool, Dhake Colony, Jalgaon - 425001 Ph.No. 0257-2239666

**Maharashtra Political Science and Public Administration Conference**

Reg. No. MAH/12-83/ Aurangabad-F-985

**Visit Us : www.mpspac.com** **E-Mail : vicharmanthanjournal@gmail.com**

**Subscription**

**Individuals : Rs. 1000/-** For Five Years **Institutions : Rs. 1500/-** For Five Years Singal Issue Price Rs.100/



विचारमंथन या अर्धवार्षिकात प्रसिद्ध झालेली मते संपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक आणि सल्लागार मंडळ यांना मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखातील लेखकांची मते ही त्यांची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी ज्या-त्या लेखकांवर राहिल.



मेसर्स अथर्व पब्लिकेशन्स्च्यावतीने कार्यकारी संपादक श्री.युवराज माळी यांनी प्लॉट नं.१७, देविदास कॉलनी, धुळे-४२४ ००१. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले व आविष्कार प्रिंटर्स, अयोध्यानगर, जळगाव येथे मुद्रित केले. मोबाईल : ९४०५२०६२३०,फोन : ०२५७-२२३९६६६.


Scanned with CamScanner

Vichar Manthan (A Peer Reviewed Journal) ISSN 2347-9639
Vol - 3 No - 3 Sept.- Dec. 2014


- धर्मनिरपेक्षता : भारतीय लोकशाहीसाठी आवश्यक/काळाची गरज .................. ५०
  -प्रा.डॉ.संजय वामनराव भोळे, शेंदुर्णी
- धर्मनिरपेक्षता आणि गुर्जर .................. ५२
  -मनीषा दत्तात्रय पवार, जळगाव.
  -प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, अमळनेर.
- भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्यायाची संकल्पना .................. ५४
  -डॉ आण्णासाहेब ग. हारदारे, गडहिंग्लज
- भारतातील धर्मनिरपेक्षतेची संकल्पना .................. ५६
  -डॉ. वकील टी. शेख, नागपूर
- **Challenges in Front of Indian Secularism** .................. 59
  -Dr.B.D.Todkar, Ahmednagar
- **A Glance at Secularism in India** .................. 63
  -Dr. Sunil V. Shinde, Parbhani
  -Shekhar B. Ashtikar, Parbhani
- **Indian Secularism: Politics and Challenges** .................. 66
  -Prof. Sanjay.P.Harale, Borgaon
- **Secularism and the Law- Provision and Practice** .................. 69
  -Vijaykumar Ramrao Gurjar, Karjat
- **Indian Secularism-Value and Practice** .................. 72
  -Prof.Dr.Sharad Ghodke, Pune
- **Secularism and Party Politics** .................. 74
  -Dr. S. N. Kayande, Patur
- **Secularism in India** .................. 77
  -Dr. Baig Rehanara Ismail, Pabal
- **Secularism- Relevance of Secular Humanism in the Context of SAARC** .................. 79
  -Dr. Vidya Raut, Akola
- **Secularism and National Integration in India** .................. 82
  -Dr. Prafulla Ajabrao Raut, Chandur Bazar
- **Maulana Azad's Idea of Secularism in Context with India** .................. 85
  -Shaikh Faruk Ismail, Shirpur


Scanned with CamScanner

# धर्मनिरपेक्षता: भारतीय लोकशाहीसाठी आवश्यक/काळाची गरज

प्रा.डॉ.संजय यामनराव भोळे
गेंदुर्णी

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्यपुर्व काळापासून भारतामध्ये विविध धर्मीय लोक एकाच छत्राखाली नांदत होते. १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याच आधारावर भारतात लोकशाही व्यवस्थेचा स्विकार करण्यात आला आणि एकूणच देशाच्या एक संघतेचा विचार करून भारतीय राज्यघटनाकारांनी धर्मनिरपेक्षतेचा समावेश राज्यघटनेत करून भारताचे कल्याण साधण्याचा व भारतातील धार्मिक एकात्मता साधण्याचा प्रयत्न केला.

राज्याचा कोणताही विशिष्ठ असा धर्म असणार नाही अशी धर्मनिरपेक्षतेची संकल्पना निश्चित करून सर्वधर्म समभावाची भावना व मानवता हाच खरा धर्म असेल या अनुषंगाने राज्यघटनेत काही तत्वांचा समावेश केला. धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब आहे. व्यक्तीला कोणत्याही धर्माचा स्विकार करता येईल व कोणत्याही धर्माच्या तत्वाचे पालन करता येईल असे राज्यघटनेत स्पष्टपणे सांगीतले असले तरी धर्माच्या प्रचार व प्रसाराबाबत मात्र भारतीय राज्यघटनाकारांनी योग्य दखल घेऊन धर्माचा प्रसार-प्रचार करण्यावर व धर्म लादण्यावर मात्र व्यक्तीवर बंदी घातली आहे.या सर्व तत्वांचा विचार केला तर भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने जी धर्मनिरपेक्षता निर्माण होणे भारतीय लोकशाहीच्या विकासासाठी आवश्यक होती ती धर्मनिपेक्ष रचना भारतात निर्माण होणे भारतीय लोकशाहीच्या विकासासाठी आवश्यक होती.ती धर्मनिरपेक्ष रचना भारतात निर्माण होतांना दिसत नाही. धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली अनेक धर्मांधशक्ती भारतीय लोकशाहीला कुचकामी करतांना दिसतात. तेव्हा भारतात धर्मनिरपेक्ष राज्याची सुव्यस्थीत प्रस्थापना झाली आहे काय ? असा प्रश्न पडतो.

भारतात निर्माण झालेला बहुसंख्याकवाद आणि अल्पसंख्याकवाद अशा प्रकारच्या धार्मिक जमातवादाच्या वाढत्या लाटांमधुन वरील प्रश्नांची नकारात्मक उत्तरे मिळतात.

भारतात हिंदू, मुस्लीम,ख्रिश्चन,शिख,जैन,बौध्द या विविध धर्मामध्ये धार्मिक संहिष्णुतेचीच तत्वे आहेत. परंतु त्या धर्मातील चांगल्या तत्वांचा विचार न करता केवळ धार्मिक अहंकाराच्या माध्यमातुन त्या विविध धर्मातील संहिष्णुतेचा ढाचा नष्ट होवुन भारतात खरी धर्म निरपेक्षता नष्ट होतांना दिसत आहे. म्हणुनच भारताच्या भविष्यकालीन विकासाचा आढावा घेता या धर्मनिरपेक्षतेचा आजच्या काळात वास्तवरितीने विचार होणे अतिशय गरजेचे आहे. अन्यथा भारताच्या लोकशाहीचा ठाचा हा विविध धर्मकेंद्रीत होऊन खऱ्या अर्थाने भारताच्या महासत्तेची व एकात्मतेची स्वप्ने नष्ट होतील. याच अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन करण्यात आले आहे.

**शोधनिबंधाची उद्दीष्टे -**

१) भारतातील धर्मनिरपेक्षतेचा मुळ ढाचा स्पष्ट करणे.
२) धर्मनिरपेक्षता यामधील धार्मिक सहिंष्णुता स्पष्ट करणे.
३) विविध धर्मातील धार्मिक एकतेची खरी संकल्पना स्पष्ट करणे.
४) मानवता हाच खरा धर्म आहे याचा आढावा घेणे.
५) बदलत्या काळात धर्मनिरपेक्षतेचा बदलणारा दृष्टीकोन स्पष्ट करणे.
६) भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने धर्मनिरपेक्षतेचा खरा अर्थ स्पष्ट करणे.

**धर्मनिरपेक्षता व भारतीय लोकशाहीची चौकट/वास्तवता-**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतात धर्मनिरपेक्षतेचा स्विकार हा संपुर्ण देशाच्या एकत्रिकरणासाठी व सर्वांगीण विकासासाठी करण्यात आला असला तरी आधुनिक काळात मात्र या संकल्पनेच्या दृष्टीकोनातुन विचार होणे काळाची गरज झाली आहे.

भारतातील काही विचारवंताच्या मते आजपर्यंत धर्मनिरपेक्ष हा घटक राजकीय व सामाजिक विचारवंतासाठी एक अनाकर्षकच विषय राहीला असल्याचे स्पष्ट होत आहे. यामध्ये अमर्त्य सेन या विचारवंताचा उल्लेख प्रामुख्याने करता येतो. म्हणून आजच्या परिस्थीतीत धर्मनिरपेक्षता व भारतीय लोकशाही याची वास्तवता काय आहे याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

**भारतातील राजकारण व धर्मनिरपेक्षता :-**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतात व्यापकतेचा विचार करून धर्मनिरपेक्ष लोकशाही व्यवस्थेचा स्विकार करण्यात आला आणि राजकारणाच्या पटलावर देखील धर्मनिरपेक्षतेचा स्विकार झाला पाहिजे अशी भूमीका म.गांधी, पं.नेहरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अनेक राजकीय पटलावर काम करण्याऱ्या नेत्यांची स्पष्ट होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तर त्याला मुर्त स्वरूप देण्याचे काम भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातुन केले. परंतु भारताच्या राजकीय पटलावर दिवसें-दिवस धर्मांधतेचा पगडा वाढतांना दिसत आहे. त्यामुळे धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ? असा प्रश्न सर्व सामान्य माणसाला सुध्दा आज पडत आहे. राजकारणातुन समाजकारण असा असलेला मुळ भारतीय राजकारण्यांचा ढाचा नष्ट होऊन धर्मकारणातुन राजकारण आणि राजकारणातुन सत्ताकारण असा क्रम झाल्यामुळे आज सर्वसामान्य माणसाला राजकारणाबद्दल फारशी आस्था असलेली दिसत नाही. त्याचा परिणाम राजकीय उदासीनतेत होऊन भारतीय लोकशाही ही अल्पसंख्यांकाची लोकशाही होतांना दिसत आहे. भविष्यात जर भारतीय राजकीय व्यवस्थेत धर्माचा वाढता प्रभाव निर्माण झाला तर भारतीय लोकशाहीतील धर्मनिरपेक्षता ही केवळ नावापुरती शिल्लक राहुन त्याचा विपरीत परिणाम संपुर्ण समाज व्यवस्थेवर झाल्याशिवाय राहणार नाही. कारण आज ही भारतामध्ये

हिन्दु-मुस्लीम, किंवा इतर धर्माधर्मांमध्ये असणारी एकतेची भावना नष्ट होऊन त्यांच्यात टोकाची असंहिष्णुता निर्माण होऊन त्याचा परिणाम भारतीय लोकशाहीसाठी आवश्यक असणाऱ्या एकात्मतेच्या घटकावर होत आहे. आजपर्यंत भारतामध्ये राममंदीर व बाबरी मस्जीद या घटकावर आधारीत राजकारण होऊन लोकांच्या मुळ विकासात्मक मुद्याला मात्र तिलांजली होतांना आपणास स्पष्टपणे दिसत आहे. म्हणून भारतामध्ये बहुधर्मीय लोक राहतात याचा कोणत्याही राजकीय पक्षाला विसर पडता कामा नये तर खारी सक्षम लोकशाही व्यवस्था निर्माण करणे हेच राजकीय पक्षाचे ध्येय असले पाहीजे असा विचार करणे आवश्यक आहे.

**भारतातील धार्मिक स्थिती व लोकशाही –**

खऱ्या अर्थाने धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब आहे. अशा अनुषंगाने भारतीय राज्यघटनेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकांच्या भावनेचा खऱ्या अर्थाने आदर केलेला आहे. याचा अर्थ कोणताही धर्म मानवतेच्या पलीकडे जाऊन आपले वेगळे अस्तित्व सिध्द करू शकत नाही. तर कोणताही धर्म हा मानवतेच्या कल्याणाच्या दृष्टीने विकसीत झाला पाहीजे कारण कोणत्याही धर्मात धार्मिक संहीष्णुतेचीच बीजे असतात. या सर्व घटनाकारांच्या वैचारीकतेच्या माध्यमातुन धर्म निरपेक्षतेची बीजे भारतीय लोकशाही व्यवस्थेत रूजविण्याचे प्रयत्न केले.

आज भारतामध्ये हिन्दु, मुस्लीम, ख्रिश्चन, बौध्द, जैन इ.धर्म हे मानवतेच्या आधारावर आपले अस्तित्व सिध्द करत असले तरी प्रत्येक धर्मातील काही धर्माध शक्ती ह्या धर्मनिरपेक्षतेला फाटा देवुन धर्म-धर्मा मध्ये वितुष्ट निर्माण करतांना दिसतात. याचा परिणाम मानवतेच्या एकात्मतेच्या मूल्यावर होऊन धार्मिक असंहिष्णुतेचा उदय त्यातुन होतांना दिसत आहे. म्हणून भविष्यात खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाही ही विकासाकडे वाटचाल करणारी असली पाहीजे असे आपणास वाटत असेल तर या लोकशाहीत विध्वंसक रूपाने धर्माचा शिरकाव वेळीच थांबणे गरजेचे आहे. तरच भारताच्या महासत्तेची खरी स्वप्ने साकार होवुन उद्याचा भारत हा सुजलाम-सुफलाम तर होईलच त्याबरोबरच मानवतेचे रक्षण करणारी ही लोकशाही व्यवस्था होईल.

महाराष्ट्रात आजही मोठ्या प्रमाणात अनेक राज्यामध्ये धर्माच्या नावावर राजकारण होत असल्याचे स्पष्ट चित्र आपणास दिसते. उत्तरप्रदेश, महाराष्ट्र व इतर राज्यामध्ये याचा प्रभाव अधिक दिसतो.

**भारतातील सामाजिक परिस्थीती–**

भारत हा बहुसंस्कृतीय देश आहे त्याचप्रमाणे अनेक समाज घटकांचे अस्तित्व भारतात आहे. सामाजिक दृष्ट्या विचार करता प्रत्येक व्यक्तीच्या मनात सामाजिक समतेऐवजी धार्मिक अभिमान याला अधिक महत्व दिसुन येते. खऱ्या अर्थाने भारतात स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्वानुसार सामाजिक लोकशाही निर्माण होणे गरजेचे आहे. असे असतांना देखील भारतातील बहुधर्मीय लोकांच्या मनात सामाजिक विकासाचा दृष्टिकोन निर्माण होण्याऐवजी धार्मिक संघर्षाचा मुद्दा समोर येतो. त्यामुळे सामाजिक कल्याणाची खरी लोकशाही लोप पावतांना दिसत आहे. म्हणून डॉ.आंबेडकरांनी भारतीय राज्य घटनेच्या निर्मीतीच्या वेळी घटना परिषदेत उपस्थित सदस्यांसमोर दिलेले भाषण अत्यंत महत्वपुर्ण वाटते आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले की आज आपण एका विसंगतीपुर्ण वातावरणात प्रवेश करत आहोत कारण एकीकडे भारताची राज्यघटना सामाजिक कल्याणाच्या लोकशाही मुद्यावर उभारली असतांना दुसरीकडे प्रचंड मोठी सामाजिक, आर्थिक, राजकीय विषमतेची दरी भारतात आहे. ज्यामुळे मोठया मेहनतीने निर्माण केलेली भारतीय राज्यघटना हे लोक उध्वस्त करू शकतील. याचाच अर्थ भारतीय समाजव्यवस्थेत प्रचंड मोठी सर्वांगीन विषमतेची दरी होती व आजही आहे. ज्याचा परिणाम भारतीय लोकशाहीवर होत आहे.

**निष्कर्ष –**


एकंदरीतच प्रचंड मोठया भारतीय स्वातंत्र्य लढ्यातुन भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे अनेकांच्या बलीदानातुन मिळालेले आहे. आणि या बलीदानात केवळ मानवता किंवा मानव धर्म याचाच केवळ महत्वाचा विचार होता म्हणून स्वातंत्र्यपुर्व काळात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सर्वधर्माचे लोक एकाच छत्राखाली येऊन ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीला विरोध करीत होते आणि त्याचाच परिणाम म्हणून भारताला १५ ऑगष्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले.पण स्वातंत्र्याच्या ७० वर्षात आपण पदार्पण करतांना मात्र धर्मनिरपेक्षतेचा विचार मात्र लोप पावतांना आपणास स्पष्टपणे दिसतो म्हणून भारताच्या स्वातंत्र्य लढ्यानंतर निर्माण झालेली धर्मनिपरपेक्ष लोकशाही काळाच्या ओघात नष्ट होता कामा नये याचा विचार आता सामाजिक,राजकीय,धार्मिक इ.पातळीवर होणे हीच खऱ्या भारताच्या महासत्तेची गरज आहे.

**संदर्भग्रंथ –**


१) रोजेंद्र व्होरा आणि सुहास पळशीकर, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लीकेशन पुणे, प्रथम आवृत्ती २०१०
२) कुळकर्णी सुधाकर, भारतीय शासन आणि राजकारण,विद्याबुक पल्बीशर्स, औरंगाबाद, सुधारीत आवृत्ती जून २०१२
३) देशमुख अलका , एकविसाव्या शतकातील बदलते समाजकारण आणि राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन नागपुर, पहिली आवृत्ती,सप्टेंबर २०१०
४) सुरवाडे दिलीप, लोकशाही एक चिंतन,लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १ मे २०१०
५) नलावडे पंडीत, भारतापुढील आव्हाणे आणि सद्यस्थीती , कैलाश पब्लीकेशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती , जानेवारी २०१५
६) पाटील वा.भा., स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकीय विचारवंत,प्रशांत पब्लीकेशन जळगांव, प्रथम आवृत्ती २००९
७) भारताचे संविधान :- भारत सरकार विधी व न्यायमंत्रालय, २०११


●●●

• महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका •




अथर्व पब्लिकेशन्स्

ISSN 2347-9639
9772347963003

Visit us... www.atharvapublications.com

Scanned with CamScanner